09 OCT 2026

पुढारी

# समाजाचे सांस्कृतिक आरोग्य जपण्याची जबाबदारी कलावंतांवर

## अभिनेते डॉ. मिलिंद शिंदे; विद्यापीठात कार्यशाळेचा समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

समाजाचे सांस्कृतिक आरोग्य जपण्यासह दुर्लक्षित आणि वंचित घटकांच्या जगण्याला मुख्य प्रवाहाशी जोडण्याची महत्त्वाची जबाबदारी कलावंतांवर आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध अभिनेते, कवी व लेखक डॉ. मिलिंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'वंचित घटकांचे सिनेमातील स्थान' या विषयावर आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते 'वंचित घटक आणि मुख्य प्रवाहातील सिनेमा' या विषयावर बोलत होते.

वंचितांच्या वेदना, संघर्ष आणि जीवनानुभव कलांच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडले जातात, तेव्हाच समाज अधिक संवेदनशील आणि समतोल बनतो. कलावंत हा केवळ मनोरंजन करणारा नसून समाजजाणीव जागृत करणारा, प्रबोधन करणारा आणि सांस्कृतिक आरोग्य जपणारा घटक आहे, असे डॉ. शिंदे यांनी सांगितले.



**कोल्हापूर : कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी बोलताना अभिनेते डॉ. मिलिंद शिंदे.**

महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांच्यासह आचार्य अत्रे, श्याम बेनेगल, गोविंद निहलानी, मीरा नायर, दीपा मेहता, शबाना आझमी, स्मिता पाटील, नंदिता दास आदींच्या योगदानामुळे वंचितांच्या प्रश्नांना व्यापक वाचा मिळाली, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी अश्विनी धायगुडे-कोळेकर यांनी 'सिनेमातील लिंगाधारित पूर्वग्रह', तर डॉ. अनमोल कोठाडिया यांनी 'वंचितांच्या चित्रपटांचे भवितव्य आणि आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थी, चित्रपट अभ्यासक, माध्यम क्षेत्रातील व्यक्ती व चित्रपट रसिक उपस्थित होते. डॉ. शिवाजी जाधव यांनी संयोजन केले. अनुप जत्राटकर यांनी आभार मानले.

09 OCT 2026

लोकमत



शिवाजी विद्यापीठ, आयआयआयटी, अलाहाबाद आणि ॲस्पायर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

# सेमीकंडक्टर शिक्षणासाठी ॲस्पायरचा सामंजस्य करार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारतातील सेमीकंडक्टर आणि डीप-टेक क्षेत्रासाठी उद्योगाभिमुख आणि भविष्यासाठी मनुष्यबळ तयार करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (आयआयआयटी), अलाहाबाद आणि ॲस्पायर नॉलेज अँड स्किल्स इंडिया यांच्यात गुरुवारी सामंजस्य करार झाला.

या करारातून विद्यार्थ्यांना सेमीकंडक्टर शिक्षणासोबत प्रत्यक्ष उद्योग अनुभव, अनुभवाधारित शिक्षण, कौशल्यविकास आणि रोजगारासाठी आवश्यक तयारी करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या कार्यक्रमास कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आयआयआयटी, अलाहाबादचे संचालक प्रा. डॉ. मुकुल सुतावणे, भुवनेश कुलकर्णी तसेच ॲस्पायर नॉलेज अँड स्किल्स इंडियाचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजय गांधी उपस्थित होते. प्रा. डॉ. सुतावणे यांचे व्याख्यान झाले. डॉ. तुकाराम डोंगळे समन्वयक होते. डॉ. किरण पवार यांनी आभार मानले.

09 OCT 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रार्थना संगीत ही जीवन उन्नतीची दिशा : केशवचैतन्य कुंटे

कोल्हापूर, ता. ८ : प्रार्थना संगीत ही जीवन उन्नतीची दिशा आहे, असे प्रतिपादन प्रा. केशवचैतन्य कुंटे यांनी केले. विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे 'प्रार्थना संगीत' या विषयावर बोलत होते.

अध्यक्षस्थानी डॉ. नंदकुमार मोरे होते. प्रा. कुंटे म्हणाले, ''जीवनाकडे सकारात्मकपणे पाहण्याची दृष्टी प्रार्थनेमुळे येते. परस्पर प्रीती, पूज्यताबुद्धीत वाढ होते. सर्व मनुष्ये सारखी असल्याचा भाव प्रार्थनेतून व्यक्त होतो. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी हे प्रार्थना समाजाच्या माध्यमातून साधले. करुणेच्या किरणांनी भरलेले जग त्यांनी याद्वारे स्वीकारले.'' डॉ. मोरे म्हणाले, ''प्रार्थना ही मानवी सद्भावाचा झरा अखंडित ठेवणारी, चैतन्यदायी ताकद असते.'' मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. पंडित सुधीर पोटे यानी परिचय करून दिला. अनिता मिस्कूळ यांनी सूत्रसंचालन केले. स्नेहल तावडे यांनी आभार मानले.

09 OCT 2026

तरुण भारत

# प्रार्थना संगीताने जीवनाची उन्नती होते : प्रा. कुंटे

त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** प्रार्थना संगीत ही जीवन उन्नतीची दिशा आहे, असे प्रतिपादन संगीताचार्य प्रा. केशवचैतन्य कुंटे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. त्यांनी 'प्रार्थना संगीत" या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी डॉ. नंदकुमार मोरे होते.

प्रा. कुंटे म्हणाले, प्रार्थना संगीताचा पाया आहेत. कर्णमधुरता व उत्कट भावनाशील अभिव्यक्ती ही प्रार्थनेत महत्त्वपूर्ण ठरते. जीवनाकडे सकारात्मकपणे पाहण्याची दृष्टी प्रार्थनेमुळे येते.

डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रार्थना ही मानवी सद्भावाचा झरा अखंडित ठेवणारी, चैतन्यदायी ताकद आहे. तिच्यामुळे अंत:शुद्ध चैतन्य गवसते, असे सांगितले.



कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना संगीताचार्य प्रा. केशवचैतन्य कुंटे.

मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सुधीर पोटे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अनिता मिस्कूळ यांनी सूत्रसंचालन केले. स्नेहल तावडे यांनी आभार मानले.

09 OCT 2026
सकाळ

# डॉ. अभय टिळक यांचे शिवाजी विद्यापीठात आज व्याख्यान

**कोल्हापूर, ता. ८ :** शिवाजी विद्यापीठातील कॉ. दत्ता देशमुख अध्यासनातर्फे प्रभाकरपंत कोरगावकर व्याख्यानमालेअंतर्गत शुक्रवारी (ता.९) सकाळी साडेदहा वाजता ज्येष्ठ अभ्यासक डॉ. अभय टिळक यांचे 'महाराष्ट्राचे अर्थकारण: प्रवाह आणि आव्हाने' या विषयावर व्याख्यान होणार आहे. बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या ग्रंथालयातील सेमिनार सभागृहात व्याख्यान होईल. डॉ. टिळक अर्थशास्त्र आणि संत साहित्याचे अभ्यासक आहेत.

0 9 OCT 2026
पुण्यनगरी

# डॉ. अभय टिळक यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कॉ. दत्ता देशमुख अध्यासनाकडून प्रभाकरपंत कोरगावकर व्याख्यानमालेंतर्गत ज्येष्ठ अभ्यासक डॉ. अभय टिळक यांचे 'महाराष्ट्राचे अर्थकारण : प्रवाह आणि आव्हाने' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. हे व्याख्यान शुक्रवारी (दि. १) सकाळी १०.३० वाजता बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या ग्रंथालयातील सेमिनार सभागृहात होईल. डॉ. अभय टिळक हे अर्थशास्त्र आणि संत साहित्याचे अभ्यासक आहेत.

09 OCT 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज डॉ. अभय टिळक यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कॉ. दत्ता देशमुख अध्यासनाच्या वतीने प्रभाकरपंत कोरगावकर व्याख्यानमालेअंतर्गत शुक्रवारी (दि. ९) सकाळी १०.३० वाजता ज्येष्ठ अभ्यासक डॉ. अभय टिळक यांचे 'महाराष्ट्राचे अर्थकारण : प्रवाह आणि आव्हाने' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या ग्रंथालयातील सेमिनार सभागृहात कार्यक्रम होईल. डॉ. टिळक अर्थशास्त्र व संत साहित्याचे अभ्यासक आहेत. महाराष्ट्राच्या सामाजिक स्थित्यंतरचा वेध घेणाऱ्या व्याख्यानास प्राध्यापक, विद्यार्थी, संशोधक व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 OCT 2026

आरेंट व्हयू

# शिवाजी विद्यापीठात अभिजात मराठीचे गौरवगान; प्रेक्षकांचा जल्लोषी प्रतिसाद

कोल्हापूर : अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेल्या मायमराठीचे जतन, संवर्धन आणि प्रचार, प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रतिबद्ध आहे. त्यासाठी राज्यभरात अनेक वैविध्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनीही मराठीच्या संवर्धनासाठी आपला वाटा उचलण्यास सिद्ध व्हावे, असे आवाहन राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात आज सायंकाळी महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अभिजात मराठी भाषा सप्ताह -२०२६ या उपक्रमांतर्गत आयोजित अभिजात मराठी, अभिमान मराठी या सांगितिक - सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. देवरे बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत होते तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित होत्या.

अभिजात मराठी भाषेचे गौरवगान करणाऱ्या या कार्यक्रमास प्रेक्षक, श्रोत्यांचा प्रचंड जल्लोषी प्रतिसाद लाभला.

उद्घाटन प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, मराठी भाषेच्या अनेक बोलींमध्ये कोल्हापूरची मराठी ही केवळ देशातच नव्हे, तर जगात वैशिष्ट्यपूर्ण आणि लोकप्रिय आहे. या भाषेचा आपण नेहमी अभिमान मिरवला पाहिजे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल राज्यभरातील विद्यापीठांत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठालाही या गोष्टीचा मोठा अभिमान असल्याने हा कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. येथून पुढेही असे मराठी भाषेच्या गौरवपर कार्यक्रम आयोजित करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

सुरवातीला मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी मंचावर कुलसचिव डॉ. विलास शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाला विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी, विविध अधिकार मंडळांचे




सदस्य, अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोल्हापूरच्या सुपुत्रांनी गाजविला कार्यक्रम

कोल्हापूरचे सुपुत्र असलेले सुप्रसिद्ध गायक बंधू डॉ. अभिजीत कोसंबी आणि प्रसेनजीत कोसंबी यांनी आपल्या गायनवैविध्याने अभिजात मराठीचा हा कार्यक्रम गाजविला. भक्तीगीतांपासून वासुदेव गीतांपर्यंत आणि आदिवासी गीतांपासून चित्रपट गीतांपर्यंत अशी अनेकविध गीते गाऊन त्यांनी कार्यक्रमात मोठी रंगत आणली. त्यांना गायिका सपना हेमण यांची साथ लाभली. दिगंबर नाईक यांचे नेटके संयोजन लाभलेल्या या कार्यक्रमात मराठी भाषेचे वैविध्य आणि वैभव दर्शविणाऱ्या गीतांबरोबरच मंगळागौर, लावणी, आदिवासी, गोविंदा, कोळीनृत्य इत्यादी नृत्यप्रकारांचेही सादरीकरण करण्यात आले.

09 OCT 2026

पुढारी

# महिलांच्या व्यवस्थापन कौशल्याला प्रशिक्षणाची जोड आवश्यक

## डॉ. आलोक जत्राटकर; शिवाजी विद्यापीठात मार्केटिंग, विक्री कौशल्य कार्यशाळेला प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महिलांमध्ये उपजतच असणारे सामाजिक व आर्थिक व्यवस्थापन कौशल्य विकसित करण्यासाठी योग्य प्रशिक्षण व मार्गदर्शन आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व इंडोकाऊंट फाऊंडेशनअंतर्गत महालक्ष्मी कौशल्य विकास केंद्र, गोकुळ शिरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'महिलांसाठी मार्केटिंग आणि विक्री कौशल्य' कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार होते.

प्रफुल्ल रंगारी यांनी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी इंडोकाऊंटच्या प्रयत्नांची माहिती दिली. डॉ. पवार यांनी बचत गटांनी उत्पादनाच्या गुणवत्तेसोबत प्रभावी ब्रँडिंग, मार्केटिंग व विक्री व्यवस्थापन आत्मसात करावे, असे सांगितले.

या कार्यशाळेत रवींद्र खैरे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी संदीप माने, स्मिता जाधव, दिशा अग्रवाल आदी उपस्थित होते. प्रमोद कांबळे यांनी प्रास्ताविक केले. ईश्वर पुजारी यांनी आभार मानले.

09 OCT 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांमधील उपजत व्यवस्थापन कौशल्याच्या विकासासाठी योग्य प्रशिक्षण आवश्यक : डॉ. आलोक जत्राटकर

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

महिलांमध्ये उपजतच असणारे सामाजिक व आर्थिक व्यवस्थापन कौशल्य विकसित होण्यासाठी योग्य प्रशिक्षणाची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्र व इंडोकाऊंट फाऊंडेशन अंतर्गत महालक्ष्मी कौशल्य विकास केंद्र, गोकुळ शिरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित " महिलांसाठी मार्केटिंग आणि विक्री कौशल्य" या दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते काल (दि. ५) बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार होते, तर इंडोकाऊंटचे सल्लागार प्रफुल्ल रंगारी प्रमुख पाहुणे होते.



डॉ. जत्राटकर म्हणाले, महिलांमध्ये कुटुंबाचे अर्थकारण सांभाळण्याची, उपलब्ध संसाधनांचे योग्य नियोजन करण्याची आणि मर्यादित साधनांतून घर चालविण्याची नैसर्गिक क्षमता असते. हीच क्षमता योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाच्या माध्यमातून उद्योजकीय क्षेत्रात प्रभावीपणे वापरता येऊ शकते. विक्री आणि मार्केटिंगचे मूळ संवादात आहे. ग्राहकांशी योग्य संवाद साधता आला, तर उत्पादनाकडे पाहण्याची दृष्टी बदलते आणि विश्वासाचे नाते तयार होते. महिलांनी केवळ उत्पादननिर्मितीपुरते मर्यादित न राहता बाजारपेठ, ग्राहकसंपर्क, ब्रँडिंग आणि उत्पादन विविधीकरण यांचा विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. जत्राटकर यांनी स्थानिक बाजारपेठेतील संधी अधोरेखित करताना सांगितले की, बचत गटांनी आपल्या परिसरातील ग्राहकांशी थेट संपर्क वाढवावा. सण-उत्सव, स्थानिक विक्रीकेंद्रे, लहान दुकाने आणि घरगुती पुरवठा व्यवस्था यांचा योग्य उपयोग करून महिलांना आपले उत्पादन अधिक प्रभावीपणे पोहोचविता येते. छोट्या गटांनाही योग्य नियोजन, दर्जेदार उत्पादन आणि ग्राहकांशी सुसंवाद यामुळे मोठे स्थान निश्चितपणे निर्माण करता येऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. शिवाजी विद्यापीठ समाजातील सर्व घटकांसाठी कौशल्यविकास उपक्रम राबवत असून समाजाच्या मुख्य प्रवाहात सर्वांना सन्मानाने स्थान मिळावे, ही विद्यापीठाची बांधिलकी असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रफुल्ल रंगारी म्हणाले, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होण्याच्या दृष्टीने इंडोकाऊंट समूह सातत्याने प्रयत्नशील आहे. शिवाजी विद्यापीठाच्या सहकार्यामुळे या उपक्रमाला मोठे पाठबळ लाभले आहे. हे सहकार्य अधिक वृद्धिंगत करून अधिकाधिक महिलांचे यामध्ये समावेशन व्हावे, या दृष्टीने पुढील काळात प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. रामचंद्र पवार म्हणाले, महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून विविध उत्पादने तयार करण्याबरोबरच त्यांचे प्रभावी ब्रँडिंग, मार्केटिंग आणि विक्री व्यवस्थापन कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. उत्पादनाची गुणवत्ता जितकी महत्त्वाची आहे, तितकेच योग्य बाजारपेठ शोधणे, ग्राहकांपर्यंत उत्पादन पोहोचविणे आणि विक्री विपणन या बाबीही आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मंचावर ग्रामोद्योग अधिकारी संदीप माने, व्यवसाय मार्गदर्शक रविंद्र खैरे उपस्थित होते. स्मिता जाधव व दिशा अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेमध्ये श्री. खैरे यांनी मार्केटिंग, विक्री कौशल्य, ग्राहकांशी संवाद, उत्पादनाचे सादरीकरण आणि व्यवसायवृद्धीसाठी आवश्यक विविध बाबींवर मार्गदर्शन केले. महिला बचत गटांच्या सदस्यांचा कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रकल्प समन्वयक प्रमोद कांबळे यांनी केले. कौशल्य विकास अधिकारी ईश्वर पुजारी यांनी आभार मानले

09 OCT 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पात्र विद्यार्थ्यांची यादी करून त्यांचे प्रस्ताव द्या

## उच्च शिक्षण सहसंचालकांची सूचना; परीक्षा शुल्क माफीबाबत बैठक

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ८ : परीक्षा शुल्क माफीच्या सवलतीसाठी पात्र विद्यार्थ्यांची पहिल्यांदा यादी तयार करा. त्यांचे प्रस्ताव द्या, अशा विविध सूचना आज कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांनी शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांना केल्या.**

खरीप हंगाम २०२६ मध्ये 'ट्रिगर-१' लागू झालेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यांतील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात माफी देण्याच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने उच्च शिक्षण विभागाने कार्यवाही सुरू केली आहे. याबाबत डॉ. बच्छाव यांनी महाविद्यालयांची ऑनलाइन बैठक घेऊन पात्र विद्यार्थ्यांची माहिती संकलित करून तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

शासनाने २५ सप्टेंबरच्या निर्णयानुसार राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर केली आहे. या भागांसाठी विविध उपाययोजना, सवलती लागू केल्या आहेत. त्यात शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी दिली जाणार आहे. याअनुषंगाने महाविद्यालयांनी पहिल्यांदा परीक्षा शुल्क माफीसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तयार करावी. त्यांच्या पालकांशी संपर्क साधावा. उत्पन्नाच्या दाखल्यांसाठी तहसीलदारांशी चर्चा करावी. एकही विद्यार्थी या परीक्षा शुल्क माफीच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याची सूचना डॉ. बच्छाव यांनी केली. या बैठकीसाठी विद्यापीठातून प्रल्हाद जाखले यांच्यासह कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील अनुदानित आणि विनाअनुदानित महाविद्यालयांतील प्राचार्य, प्रतिनिधी उपस्थित होते.

### सधन महाविद्यालये करणार मदत

**■ दुष्काळग्रस्त भागातील महाविद्यालयांना इतर सधन महाविद्यालयांनी मदत करण्याची सूचना उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. याअनुषंगाने विद्यापीठ आणि सधन महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी कृती समिती स्थापन करून कार्यवाही सुरू करावी, असे डॉ. बच्छाव यांनी सांगितले.**

09 OCT 2026
सकाळ

# डॉ. तारा भवाळकर यांना शोभाताई कोरे जीवन गौरव

## शामशादबी पठाण यांना 'वनशोभाश्री' पुरस्कार

वारणानगर, ता. ८ : येथील वारणा महिला समूहाच्या माजी अध्यक्षा शोभाताई कोरे यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'जागर स्त्री-शक्तीचा दिव्य शोभाई स्मृती पर्व' यानिमित्त ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर यांना शोभाताई कोरे राज्यस्तरीय महिला जीवन गौरव पुरस्कार देण्यात येणार आहे, अशी माहिती वारणा समूहाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे, वारणा महिला शक्तीच्या अध्यक्षा शुभलक्ष्मी कोरे यांनी दिली.

सावित्री महिला औद्योगिक संस्थेच्या वतीने ९ ते १२ ऑक्टोबरदरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सोमवारी (ता. १२) दुपारी ४ वाजता पुरस्कार वितरण होईल. शोभाताई कोरे (आईसाहेब) राज्यस्तरीय महिला जीवन गौरव पुरस्कार सांगलीच्या ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. तारा भवाळकर यांना, तर वारणा साखर कारखान्याच्या नर्सरी विभागाच्यावतीने देण्यात येणारा 'वनशोभाश्री पुरस्कार' शेडशाळ येथील डॉ. आप्पासाहेब पाटील महिला देशी वाण संरक्षण व संवर्धन सहकारी बीज बँकेच्या अध्यक्षा शामशादबी इब्राहिम पठाण यांना दिला जाणार असल्याचेही श्री. कोरे यांनी सांगितले.



डॉ. भवाळकर



पठाण

09 OCT 2026

लोकमत

# उच्च शिक्षणासाठी राज्यात 'सीएम-सृष्टी' योजना लागू

लोकमत न्यूज नेटवर्क



**मुंबई :** राज्यातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधन, नवोन्मेष, तंत्रज्ञान विकास आणि उत्कृष्टता केंद्रांना चालना देण्यासाठी राज्य सरकारने 'सीएम-सृष्टी' योजना लागू करण्यास मान्यता दिली आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने त्याबाबतचाशासन निर्णय जारी केला.

या योजनेचा कालावधी २०२६-२७ ते २०३०-३१ असा पाच वर्षांचा राहणार आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय उच्च व तंत्र शिक्षण संस्था, रसायन तंत्रज्ञान संस्था, पुणे येथील अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ यांचा योजनेत समावेश करण्यात आल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

"योजनेअंतर्गत विद्यापीठांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रशिक्षण, रोबोटिक्स, क्वांटम तंत्रज्ञान, अर्धसंवाहक, ड्रोन, दूरसंचार, हरित हायड्रोजन, प्रगत साहित्य आणि हवामान बदल यांसारख्या क्षेत्रांतील संशोधनाला प्राधान्य दिले जाणार आहे.